# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (शिक्षण विभाग)

E-mail ID - education.nmc@gmail.com
Landline No.0712-2567028
जा.क्र. 3466/ शि.वि. / 2017
दि. 4/01/2017

प्रती,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्य.शाळा,
म.न.पा. नागपूर.

**विषय : आपले शाळेतील विद्यार्थ्यांना बुट खरेदी करण्यास्तव रक्कम मंजुर करण्याबाबत व तशा आशयाच्या सुचना विद्यार्थ्यांना आपल्या स्तरावरुन देण्याबाबत.**

**संदर्भ** : महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग निर्णय क्र.डिसीटी 2316/प्र.क्र.133/का.1417, दि.05.12.2016

उपरोक्त संदर्भांकित शासन निर्णयान्वये कळविण्यात येते की, शासनाव्दारे थेट लाभ हस्तांतरण (DBT) प्रक्रियेवर मोठ्या प्रमाणात भर देण्यात येत आहे. जेणेकरुन लाभार्थ्यांना योजनांचा पुर्णपणे लाभ मिळेल. DBT कार्यक्रमाची व्याप्ती वाढविण्यास्तव विविध कल्याणकारी योजनांमध्ये ज्या ठिकाणी वस्तू स्वरुपात अनुदान देण्यात येत आहे, त्या ठिकाणी वस्तू स्वरुपात अनुदान देण्याऐवजी रोख रक्कमेच्या स्वरुपात अनुदान देण्यात यावे, असा निर्णय घेण्यात आलेला आहे. यास्तव,

1. पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करुन त्यांच्या आधार क्रमांकाशी जोडणी (Seeding) करणे.
2. निवड केलेल्या पात्र लाभार्थ्यांच्या प्रकरणाला मान्यता देवून त्यांना लेखी कळविणे.
3. लाभार्थ्यांनी परिमाणाप्रमाणे (Specification) वस्तूंची खरेदी करणे.
4. संबंधित यंत्रणेने लाभार्थ्याने खरेदी केलेल्या वस्तूची व सादर केलेल्या पावतीची शहनिशा करुन पुर्णपणे खातरजमा झाल्यावर लाभार्थ्याच्या बँक खात्यावर योजने अंतर्गत सुनिश्चित केलेल्या अनुदानाची रक्कम जमा करणे.
5. लाभार्थ्यांना रोख रक्कमेच्या स्वरुपात अनुदान त्यांच्या आधार क्रमांकाशी निगडीत बँक खात्यात जमा करण्यात यावे.

अशी मार्गदर्शक तत्वे देण्यात आलेली आहेत. नागपूर महानगरपालिकेच्या सर्व विद्यार्थ्यांना बुट देण्याचा निर्णय घेण्यात आलेला होता. याअनुषंगाने निविदा प्रक्रिया राबविण्यात येवून पुरवठादार निश्चित करण्यात येवून स्थायी समिती ठराव क्र.823, दि.09.12.2016 अन्वये इयत्ता नर्सरी ते 5 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना **बाटा** कंपनीचे बुट व इयत्ता 6 वी ते 12 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना **लिबर्टी** कंपनीचे बुट घेण्याबाबत खालील तक्त्यात नमुद दराप्रमाणे मंजुरी प्रदाण करण्यात आलेली होती.

| Sl.No | Class / Size | Rate |
|---|---|---|
| 1 | Size 7 / Nursery | 176 |
| 2 | Size 8 / KG-I | 176 |
| 3 | Size 8 / KG-I | 176 |
| 4 | (Size 10) / Class 1 | 175 |
| 5 | (Size 11) / Class 2 | 176 |
| 6 | (Size 12)/Class 3 | 182 |
| 7 | (Size 13) / Class 4 | 183 |
| 8 | (Size 1) / Class 5 | 183 |
| 9 | (Size 2) / Class 6 | 197 |
| 10 | (Size 3) / Class 7 | 197 |
| 11 | (Size 4) / Class 8 | 197 |
| 12 | (Size 5) / Class 9 | 197 |
| 13 | (Size 6+7) / Class 10 | 221 |

| Sl.No | Class / Size | Rate |
|---|---|---|
| 14 | (Size 7+8) / Class 11 | 221 |
| 15 | (Size 8+9) / Class 12 | 220 |

स्थायी समितीच्या निर्णयापूर्वी दि.05.12.2016 ला शासन निर्णय प्राप्त झाल्यामुळे उपरोक्त मार्गदर्शक तत्वे क्र.1ते5 प्रमाणे कार्यवाही करुन विद्यार्थ्यांना बुट उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. यास्तव आपणास खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात येत आहेत.

1. आपले शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना किंवा त्यांच्या पालकांना प्रस्तुत परिपत्रक दाखवून परिपत्रकातील मार्गदर्शक तत्वांबाबत सुचना देवून सर्व विद्यार्थ्यांचे इयत्तानिहाय नावानिशी यादी तयार करुन त्यात नावासमोर विद्यार्थ्यांचा आधार कार्ड क्रमांक टाकावा. तसेच आधार कार्डसोबत लिंक केलेल्या बँक खात्याचा अकाऊंट नंबर, बँकेचे नाव, शाखा व IFSC Code टाकावा.

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | बुटाचा साईज | आधार कार्ड क्रमांक | आधार कार्डसोबत लिंक केलेल्या बँक खात्याचा अकाऊंट नंबर | बँकेचे नाव | शाखेचे नाव | IFSC Code | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | | | | | | | | | |

2. तक्ता क्र.अ मध्ये नमुद वर्गनिहाय / साईजनिहाय प्रती जोडी दर अनुदानासाठी मंजुर करण्यात येईल, याबाबतच्या सुचना विद्यार्थी व पालकांना देण्यात याव्यांत.
3. तक्त्यात नमुद वर्गनिहाय / साईजनिहाय दराप्रमाणे इयत्ता नर्सरी ते 5 वी पर्यंत बाटा कंपनीचे व इयत्ता 6 ते 12 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना लिबर्टी कंपनीचे बुट त्यांचे स्तरावर खरेदी करुन याबाबतचे देयक शाळेतील मुख्याध्यापक / संबंधित वर्गशिक्षक यांचेकडे सादर करावे.
4. विद्यार्थ्यांव्दारा सादर केलेल्या पावतीची शहनिशा व विद्यार्थ्याने बुट खरेदी केल्याबाबतचे प्रमाणपत्र शाळेतील मुख्याध्यापक यांनी त्यांचे शाळेच्या लेटरपॅडवर पावतीसोबत पाठवावे.
5. विद्यार्थ्यांना रोख रक्कमेच्या स्वरुपात अनुदान वितरीत करण्यास्तव त्यांच्या / पालकांच्या आधार कार्ड क्रमांकाशी निगडीत बँक खाते क्रमांक व पासबुकची प्रथम पानाची छायांकित प्रत प्राप्त करुन घेवून पावती व लेटरपॅडसह विभागास पाठवावी.

उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करुन विद्यार्थ्यांना बुट पुरविण्यास्तव मार्गदर्शन करावे. संबंधित कार्यप्रणालीबाबत आपणास काही अडचण असल्यास आपले झोनचे शाळा निरीक्षक यांना किंवा श्री.विनय बगले (98230232660), यांना संपर्क साधावा.

**(मा.आयुक्त यांचे दि. 4/01/2017 चे मंजुरीअन्वये)**

**(फारुक अहमद खान)**
**शिक्षणाधिकारी**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**

PC:3/D/SRW/Letter & note/Letter(2).doc